Suresh Dada Scheme for
Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

www.sdseed.in

18 YEARS
EMPOWERING STUDENTS SINCE 2008
Suresh Dada Scheme for
Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

आमचे प्रेरणास्थान



आदरणीय श्री सुरेशदादा जैन

SEED

www.sdseed.in

18 YEARS
EMPOWERING STUDENTS SINCE 2008
Suresh Dada Scheme for Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

- ## ध्येय

'गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक व उद्योजकीय कौशल्ये विकसित करून त्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनविणे.'

उद्दिष्टे

- **शैक्षणिक जागरूकता:** सर्व समाजामध्ये शिक्षणाचे महत्त्व वाढविणे
- **आर्थिक मदत:** पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि आर्थिक सहाय्य प्रदान करून त्यांना त्यांची शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यास मदत करणे.
- **रोजगार क्षमता वाढवणे:** विद्यार्थ्यांना यशस्वी करिअरसाठी आवश्यक कौशल्ये आणि अनुभव देण्यासाठी व्यापक विकास कार्यक्रमांची आखणी करणे.
- **शाश्वतता:** आमच्या कार्यक्रमांचा फायदा विदयार्थ्यांना दीर्घकाळ होत राहील हे सुनिश्चित करणे. जेणे करून वाढत्या संख्येने विद्यार्थ्यांना फायदा होईल.
- **व्यापक उपक्रम**: विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांना सक्षम करणारे कार्यक्रम विकसित करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे.

- ## कार्यक्षेत्र

जळगाव जिल्ह्यातील सर्व जाती, धर्म पंथातील इयत्ता ८ वी त्यापुढील विद्यार्थ्यांना एसडी-सीड योजने अंतर्गत लाभ घेता येईल.

पार्श्वभूमी

- **सुरेशदादा शैक्षणिक आणि उद्योजकता विकास योजना (एसडी-सीड) २००८ मध्ये** जळगाव जिल्ह्यातील तरुणांमध्ये शिक्षण आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी सुरु करण्यात आली.

- आमचे प्रेरणास्थान आदरणीय सुरेशदादा जैन यांना विश्वास आहे की, **'शिक्षण हे समाजाच्या प्रगतीचे आणि वैयक्तिक सशक्तीकरणाचे मुख्य आधारस्तंभ आहेत'.**

- एसडी-सीडला मार्गदर्शन करण्यासाठी अध्यक्षा श्रीमती रत्नाभाभी सुरेश जैन, कार्यकारी अध्यक्षा मीनाक्षी जैन आणि गव्हर्निंग बोर्डचे अध्यक्ष डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी यांच्यासह ३० समर्पित लीडर आणि सल्लागार समिती आहे.

- आमचा प्रमुख उपक्रम, **'मातोश्री प्रेमाबाई जैन उच्चशिक्षण शिष्यवृत्ती',** ज्याद्वारे आर्थिक आव्हानांचा सामना करणाऱ्या शैक्षणिकदृष्ट्या होतकरू विद्यार्थ्यांना वार्षिक स्वरूपात शिष्यवृत्ती दिली जाते.

- शिष्यवृत्ती निवड समिती प्रत्येक अर्जाचे काटेकोरपणे मूल्यांकन करते, जेणे करून योग्य विद्यार्थ्यांना मदत मिळेल.

- शिष्यवृत्तीसोबतच विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास आणि भविष्यातील रोजगारक्षमता वाढवण्यासाठी प्रशिक्षण, इंटर्नशिप, मेंटॉरशिप, करिअर मार्गदर्शन यासारखे विविध विद्यार्थी-केंद्रित कार्यक्रम राबविले जातात.
- एसडी-सीड विद्यार्थ्यांच्या विकासासाठी शिक्षक प्रशिक्षण आणि पालक समुपदेशन करून शिक्षक आणि पालकांना सक्षम बनवते

एसडी-सीडचा सामाजिक प्रभाव
१५५०० शिष्यवृत्ती प्रदान
३८०० उच्चशिक्षण पूर्ण
१९५ विद्यार्थी दत्तक
२४ विद्यार्थी इंटर्नशिप पूर्ण
१३८ सहकार्य करार (MoU)
विद्यार्थी प्रशिक्षित ४९४२७
युवतींचे सशक्तीकरण ३२१५
उद्योजकता विकास ६००
करिअर मार्गदर्शन २८८
मेंटरद्वारे मार्गदर्शन ३७३
18 YEARS
EMPOWERING STUDENTS SINCE 2008

महाराष्ट्राच्या नकाशावरील जळगाव

महाराष्ट्राच्या तुलनेत जळगांव जिह्यातील साक्षरतेचे प्रमाण

राज्य / जिल्हा	ग्रामीण साक्षरता प्रमाण (%)		शहरी साक्षरता प्रमाण (%)		एकूण साक्षरता प्रमाण (%)	
	जनगणनेनुसार		जनगणनेनुसार		जनगणनेनुसार	
	2001	2011	2001	2011	2001	2011
महाराष्ट्र	70.36	77.09	85.48	89.84	76.88	82.91
जळगाव	72.10	76.04	83.62	87.51	75.43	79.73

स्त्रोतः www.census2011.co.in

राज्यस्तरीय साक्षरता जुळण्यासाठी जळगावमधील साक्षरतेचे प्रमाण सुधारण्यासाठी वाव आहे.

संस्थेची संरचना

सौ.रत्ना जैन
अध्यक्षा

मीनाक्षीताई जैन
कार्याध्यक्षा

डॉ.प्रसन्नकुमार रेदासनी
अध्यक्ष

एसडी-सीड असोसिएट

गव्हर्निंग बोर्ड

- श्री. निळकंठ गायकवाड
- डॉ. एस.एस.राणे
- प्रा. नंदलाल गादिया
- श्री. महेश गोरडे
- डॉ. रानिदास डाकलिया
- श्री.राजेश यावलकर
- श्री. सागर पगारिया

मार्गदर्शन समिती

- श्री मनोज गोविंदवार
- प्रा. एस.व्ही. सोमवंशी
- श्री. अनिल राव
- डॉ.एस.पी.बडगुजर
- डॉ. विवेक काटदरे
- सौ.पुष्पा भंडारी
- डॉ. विजय माहेश्वरी
- डॉ.सुरेश अलीझाड
- डॉ.डी.टी. नेहते
- प्रा. संजय दहाड
- श्री. जी.टी.महाजन
- श्री. अनिल कांकरिया
- डॉ.अजित वाघ
- किरण अग्रवाल
- डॉ.गौरी राणे
- श्री. नरेंद्र जैन
- श्री. उमेश सेठिया
- श्री. शिरीष बर्वे
- प्रा. सुरेश पांडे
- श्री. अजित कुचेरिया
- श्री. विक्रांत सराफ

तालुका समन्वयक

- श्री. प्रेमचंद कोटेचा , **भुसावळ**
- श्री. नितीन बिर्ला , **एरंडोल**
- श्री. चिमण (आबा) पाटील, **पारोळा**
- श्री. पप्पुशेठ बडोला ,**पाचोरा**
- श्री. शैलेश जाजू ,**धरणगाव**
- श्री. गोविंददादा मुंदडे, **अमळनेर**
- श्री. सुरेश अलीझाड , **चोपडा**
- श्री. सुरेशचंद्र धारीवाल , **जामनेर**
- श्री. चित्रसेन पाटील , **चाळीसगाव**
- श्री. अजितकुमार रेदासनी , **मुक्ताईनगर**
- श्री. सुरेश भंडारी, **भडगाव**
- श्री. चंद्रकांत चौधरी, **यावल**
- श्री. बबनलाल अग्रवाल, **रावेर**
- श्री. विनोद कोटेचा, **बोदवड**

आमचा प्रमुख कार्यक्रम

‘मातोश्री प्रेमाबाई जैन उच्च शिक्षण शिष्यवृत्ती’

नवीन अर्जदारांसाठी निवडीचे निकष:

- विद्यार्थी जळगाव जिल्ह्यातील रहिवासी असावी.
- विद्यार्थ्याने दहावी व त्यापुढील परीक्षा पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
- कौटुंबिक वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु. २,००,०००/–
- दिव्यांग / एकल पालक / निराधार विद्यार्थ्यांना विशेष प्राधान्य दिले जाईल.
- शिष्यवृत्ती मिळण्यासाठी गुणांची पात्रता खालीलप्रमाणे असणे आवश्यक:

अ.क्र.	रहिवास	इयत्ता १० वी अपेक्षित गुण	इयत्ता १२ वी अपेक्षित गुण
१	ग्रामीण भागातील विद्यार्थी	८५ %	७० %
२	शहरी भागातील विद्यार्थी	९० %	७५ %
३	दिव्यांग / एकल पालक / निराधार विद्यार्थी	७५ %	६५ %
४	एम.एच-सीईटी	NA	१२० गुण

आमचा प्रमुख कार्यक्रम
‘मातोश्री प्रेमाबाई जैन उच्च शिक्षण शिष्यवृत्ती’

नुतनीकरण अर्जदारांसाठी निवडीचे निकष :

- विद्यार्थी (ड्रॉप-आउट विद्यार्थ्यांसह) एसडी-सीड शिष्यवृत्ती लाभार्थी असावा.
- विद्यार्थी मागील शैक्षणिक वर्षातील परीक्षा उत्तीर्ण असावा.
- विद्यार्थ्यास फक्त एका विषयात ATKT मिळालेला असावा.

गुणांची पात्रता

अ. इयत्ता १२ वी ते पदवी (प्रथम वर्ष) : किमान ७५ टक्के

ब. डिप्लोमा (तृतीय वर्ष) ते पदवी : किमान ७५ टक्के

क. पदवी ते पदव्युत्तर : किमान ७५ टक्के

- कौटुंबिक वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु. २,००,०००
- दिव्यांग / एकल पालक / निराधार विद्यार्थ्यांना विशेष प्राधान्य दिले जाईल.

दत्तक शिष्यवृत्ती कार्यक्रम

• आमचे ध्येय म्हणजे विद्यार्थ्यांच्या महत्त्वाकांक्षा आणि उपलब्ध संधी यातील अंतर कमी करणे, आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करून अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्यास आणि त्यांच्या पूर्ण क्षमतेची जाणीव करून देणे.

• पात्र विद्यार्थ्यांना आर्थिक शिष्यवृत्ती प्रदान करण्यासाठी असंख्य व्यक्ती आणि संस्थांनी एसडी-सीड सोबत सहकार्य करण्याची मनापासून इच्छा व्यक्त केली आहे.

• आमची व्याप्ती वाढविण्यासाठी व यातून लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठी आम्ही दत्तक शिष्यवृत्ती कार्यक्रम (एएसपी) स्थापन केला आहे.

•आम्ही तुम्हाला या उदात्त व पवित्र कार्यात सामील होण्यासाठी आमंत्रित करतो आणि तीन ते पाच वर्षे सतत पाठिंबा देण्यासाठी आवाहन करीत आहोत.

“ एक छोटासा आधार ... करी गुणवंतांचा उद्धार”

माजी लाभार्थी शिष्यवृत्ती परतफेड योजना

- हा कार्यक्रम जबाबदारीची भावना वाढवून कृतज्ञता, व्यापक समुदाय आणि शाश्वतता या तत्वावर आधारित आहे.
- कार्यक्रमाचा उद्देश असा आहे की, शिष्यवृत्तीचे फायदे वैयक्तिक प्राप्तकर्त्यांच्या पलीकडे व्यापक समुदायापर्यंत विस्तारावेत.
- माजी लाभार्थी इतर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, मार्गदर्शन आणि ज्ञानाची देवाणघेवाण करून विद्यार्थ्यांना मदत करतात.

विद्यार्थी हिताचे कार्यक्रम

- एसडी–सीड विद्यार्थ्यांच्या हितासाठी शिष्यवृत्ती, प्रशिक्षण आणि इतर कार्यक्रमांसह अशा पोषक वातावरणाची निर्मिती करीत आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक ध्येय सहजरित्या साध्य होण्यास मदत होईल.

- हे करण्यासाठी एसडी–सीड सर्व हितधारकांच्या समग्र सक्रिय समुदायाची बांधणी करीत आहे.

विद्यार्थी हिताचे कार्यक्रम (Cont'd)

1. आर्थिक सहाय्य योजना

- मातोश्री प्रेमाबाई जैन शिष्यवृत्ती
- दत्तक शिष्यवृत्ती
- शिष्यवृत्ती परतफेड

2. लाभार्थी हिताचे कार्यक्रम

- गणवेश व पुस्तकांचे वाटप
- बॅंक, सरकारी आणि इतर योजनांद्वारे शैक्षणिक कर्ज
- इतर शहरांमधील हॉस्टेल्सची माहिती
- विविध ग्रंथालयांची माहिती
- कोचिंग क्लासेस फी, पुस्तक खरेदी, गणवेश, स्टेशनरी आणि इतर शैक्षणिक साहित्य खरेदीवर सवलत
- ज्ञान–यज्ञ (ई–न्यूजलेटर)

3. तज्ज्ञ समुपदेशकांकडून करिअर मार्गदर्शन

विद्यार्थी हिताचे कार्यक्रम (Cont'd)

4. **प्रशिक्षण कार्यक्रम**
- विद्यार्थी मूल्यांकन कार्यक्रम
- स्पर्धात्मक आणि सार्वजनिक परीक्षांसाठी प्रशिक्षण
- परीक्षा प्रवेश प्रक्रिया माहिती
- प्रतिष्ठित व्यक्तींकडून प्रेरणादायी भाषण
- कौशल्य विकास प्रशिक्षण
- मूल्य शिक्षण
- विज्ञान अनुभव
- शिक्षकांना प्रशिक्षण
- पालकांचे समुपदेशन

5 उद्योजकता विकास मार्गदर्शन

6 मेन्टरशिप प्रोग्राम

7 समर इंटर्नशीप

8 'स्मार्ट गर्ल' प्रशिक्षण कार्यक्रम

9 एसडी–सीड अभ्यासिका

10. माजी लाभार्थी मेळावा **(Pride Alumni Meet)**

विविध सहायतांची उपलब्धी

एसडी–सीडने लाभार्थ्यांना आकर्षक सवलत मिळावी म्हणून विविध संस्थांसोबत करार केले आहेत, ज्यामुळे जिल्ह्यात सर्वांगीण विकास घडून येत आहे.

सवलतीचा प्रकार	करार केलेल्या संस्थांची संख्या
बँक (शैक्षणिक कर्ज सहायतेसाठी)	**45**
वसतीगृहे	**3**
ग्रंथालये	**3**
कोचिंग क्लासेस	**51**
पुस्तक दुकाने	**27**
नोकरी सहायता	**1**
समर इंटर्नशीप	**8**
एकूण	**138**

प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन (३० एप्रिल २०२५ पर्यंत)

(प्रशिक्षण कालावधी – जानेवारी ते डिसेंबर)

प्रशिक्षण विषय	आयोजित कार्यकमांची संख्या
कौशल्य विकास	१४१
अभ्यासाचे महत्व	२४
मुलाखत कौशल्य	४५
करिअर मार्गदर्शन, प्रेरणादायी व्याख्यान आणि वैयक्तिक समुपदेशन	५०
स्मार्ट गर्ल आणि युवती सशक्तीकरण	४३
वेळेचे व्यवस्थापन	३०
ध्येय निश्चिती व संपादन	२७
परिक्षेला सामोरे कसे जावे?	२२
सीईटी परीक्षेसाठी मार्गदर्शन	११
पालकांचे समुपदेश व शिक्षकांना प्रशिक्षण	०९
योगाचे महत्व	०३
मुल्यशिक्षण व विज्ञान अनुभव	१५
उद्योजकिय मार्गदर्शन कार्यशाळा	०४
विद्यार्थी मुल्यांकन कार्यक्रम	०१
इंव्हेस्टर बुटकॅम्प	०१
आर्थिक नियोजन	०३
एकूण	४२९

सहभागी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर, पालक व शिक्षक	सहभागी विद्यार्थ्यांची संख्या
पोस्ट–ग्रॅज्युएशन	३८७४
ग्रॅज्युएशन	१४८५७
इयत्ता 11 व 12	११९९०
इयत्ता 8 ते 10	१७४१३
पालक व शिक्षक	३३०
पालक, शिक्षक व विद्यार्थी (वेबिनार)	९६३
एकूण	४९४२७

* *कौशल्य विकास प्रशिक्षणामध्ये पुढील विषयांचा समावेश केला जातो. जसे – व्यक्तिमत्व विकास, प्रभावी संवाद, इंग्रजी बोलणे, श्रवण कौशल्य, स्मृती आणि एकाग्रता विकास, इत्यादी.*

(संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांद्वारे प्रशिक्षण देण्यात येते)

२००८ ते २०२४ शाखानिहाय दिलेली शिष्यवृत्ती



सर्वाधिक लाभार्थी इंजिनिअरींग शाखेतील आहेत

२००८ ⟷ २०२४

Total No. of Beneficiaries: १५११६

शिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांची शाखा निहाय टक्केवारी
२००९ ते २०२४



सर्वाधिक शिक्षण पूर्ण झालेले लाभार्थी इंजिनीअरींग शाखेतील आहेत.

Total No. of Pass-out Beneficiaries: ३७७६

सर्वोत्तम कार्य

- ड्रॉप आउट प्रमाण कमी करणे.
- प्रशिक्षणपूर्व आणि प्रशिक्षणानंतरचे मूल्यांकन.
- MOU - क्लासेस आणि पुस्तक विक्रेत्यांसोबत सहकार्य करार.
- समर इंटर्नशिपसाठी नामांकित संस्थांमध्ये संधी.
- शिष्यवृत्ती परतफेड आणि दत्तक शिष्यवृत्ती योजना.

आव्हाने

- विद्यार्थ्यांचे उच्च ड्रॉप ऑउट प्रमाण
- शिक्षणापेक्षा आर्थिक समस्यांना प्राधान्य दिले जाते
- पालक मुलांना अभ्यास पूर्ण करण्यासाठी प्रभावित करू शकत नाहीत
- पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात समन्वयाचा अभाव
- विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी त्यांच्याशी संवाद साधण्यात अडचण
- गुणवत्तापूर्ण शिक्षण

पुढील प्रक्रिया

- पालक-शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील परस्पर संवादासाठी उत्तम इको-सिस्टम तयार करणे
- सर्व भागधारकांचा डिजिटल समुदाय स्थापित करणे
- पालकांना सक्रिय भूमिका बजावण्यासाठी प्रोत्साहित करणे
- विद्यार्थ्यांना समुपदेशन करून उच्च शिक्षणाचे महत्त्व वाढविणे
- व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांशी संबंध ठेवणे
- परदेशात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी शैक्षणिक मेळावे घेणे
- प्लेसमेंट सेल विकसित करून नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे.

प्रमुख कार्यक्रम - २०२४

2024

2024

2024

2024

SEED

18 YEARS
EMPOWERING STUDENTS SINCE 2008
Suresh Dada Scheme for
Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

प्रमुख कार्यक्रम - २०२२ ते २०२३

2023

2023

2022

2022

18 YEARS
EMPOWERING STUDENTS SINCE 2008
Suresh Dada Scheme for Educational & Entrepreneurial Development

प्रमुख कार्यक्रम २०१७ ते २०२१

2017

2018

2020

2021

SD SEED

www.sdseed.in

18 YEARS
EMPOWERING STUDENTS SINCE 2008
Suresh Dada Scheme for Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

प्रमुख कार्यक्रम – २०१३ ते २०१६

2013

2014

2015

2016

प्रमुख कार्यक्रम – २००८ ते २०११

2008

2009

2010

2011

शिष्यवृत्ती सोहळ्याप्रसंगी मान्यवरांचे प्रेरणादायी विचार (२०१३ ते २०२४)

प्रमुख पाहुणे २०२४

डॉ. एस. एस. मंथा कुलगुरू - रामदेव बाबा युनिव्हर्सिटी, नागपूर

- शैक्षणीक अर्हतेवर आधारित करिअर आणि कौशल्य व क्षमतेवर आधारित करिअर अशा दोन पर्यायांवर एकाच वेळी समांतर काम करा.
- व्यावसायिक शिक्षण व नवीन तंत्रज्ञान हे स्थानिक रोजगार आणि आर्थिक उन्नतीसाठी संधी प्रदान करते
- व्यवसाय व्यवस्थापन, आर्थिक साक्षरता आणि नवसंकल्पना या गोष्टी आर्थिक संधी बद्दल विचार करण्यास सक्षम बनवितात.
- जिज्ञासू रहा, कठोर परिश्रम करा आणि यशस्वी होण्याच्या तुमच्या क्षमतेवर विश्वास ठेवा.

श्री दीपक चौधरी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक - स्पेक्ट्रम इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज

- आपला आत्मविश्वास मजबूत ठेवा, तोच आपल्याला अडचणीतून मार्ग काढण्याची शक्ती देतो..
- आपण स्वतः आपले प्रेरणास्रोत असतो त्यामुळे आपल्यातील उर्जा व कौशल्य बाहेर न शोधता स्वतः मध्येच शोधा.
- अपयशी लोकांच्या स्टोरी वाचून आपल्या आयुष्यात ते होऊ नये म्हणून काय काळजी घेता येईल यातून आपल्याला यशाचा मार्ग मिळतो..
- शून्यातून विश्व निर्माण करता येते त्यासाठी परिस्थिती नुसार स्वतः मध्ये बदल करा.

प्रमुख पाहुणे – 2023

डॉ. श्री. आनंद कुमार संचालक – सुपर 30, पटना

- 'अपयशच'मोठी संधी देते त्यामुळे कुठल्याही परिक्षेला वयाच्या बंधनात अडकवू नका.
- शिक्षणाला आणि आयुष्याला क्षणिक सुखात मापू नका, दुरदृष्टीतून भविष्यात उजेड पेरण्याचा प्रयत्न करा.
- पालकांनी बदल स्विकारला पाहिजे, मुलांना निर्णय घेवू द्या, त्यांना प्रेरणा द्या.
- माहितीयुक्त ज्ञान स्वविकासातून निर्माण होते आणि तेच ज्ञान संधी निर्माण करते म्हणून विद्यार्थ्यांनी प्रयोगशिलतेला वाव द्यावा.

प्रमुख पाहुणे – 2022

डॉ. सौ. सुषमा पी विरमणी – संचालक – रामानुजन इंस्टिटयुट, चेन्नई

- एसडी–सीड करीत असलेले काम अभूतपूर्व आहे. अशा महान संस्थेचा लाभ इतर जिल्हयातील विद्यार्थ्यांनाही मिळावा अशी माझी इच्छा आहे.
- विद्यार्थ्यांनी कधीही आत्मविश्वास गमावू नये आणि सदैव आनंदी रहावे.
- नेहमी मानवी मुल्यांना महत्व द्यावे व एक चांगला माणूस व्हावे हे अत्यंत महत्वाचे आहे.

प्रेरणादायी विचार (Cont'd)

प्रमुख पाहुणे – 2021



श्री. विश्वासराव पाटील – ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत, शहादा

- विद्यार्थ्यांनी किंमतीच्या जगातून निघून मुल्यांच्या जगात यायचे आहे आणि तिथेच न थांबता उदात्त मुल्यांच्या जगात यायचे आहे.
- 'दातृत्व ही जगातील सर्वात मोठी शक्ती आहे.
- मी गरीब असेल, साधारण परिस्थिती असेल तरी खचून न जाता आत्मविश्वासाने त्याला सामोरे जा.
- शिक्षणामुळेच आपण मैत्री जोपासायला शिकतो आणि त्याच्या मुळेच आपल्याला मान–सन्मान मिळत असतो.
- जीवनमुल्यांचा आपण स्विकार केला पाहिजे कारण मुल्ये माणसाला जगणे शिकवितात.

प्रमुख पाहुणे – 2018

श्री. हणमंतराव गायकवाड, संस्थापक – भारत विकास ग्रुप, मुंबई

- गुणवत्तेत कुठलीही तडजोड न करता निरीक्षण व सामान्य ज्ञान जाणून घ्या.
- 'जगात ब–याच प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध असून असे काही करा ज्यातून समाजहित, देशहितासोबत तुमचे आयुष्य सुद्धा घडेल.
- दररोज काही नवीन शिकण्याचा प्रयत्न करा. जगाच्या पाठीवर कुठेही काम करण्याची तयारी ठेवा आणि आपल्या कामाशी प्रामाणिक राहा.
- आजच्या जगात नुसते उत्तम असणे पुरेसे नाही तर कायम सर्वोत्तमच असले पाहिजे.

श्री. विजय दर्डा, अध्यक्ष – लोकमत मिडीया प्रा. लि., नागपूर

- गरजू, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करून शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यात येते.
- शिक्षण हे एकच असे माध्यम आहे, ज्याद्वारे सुसंस्कृत देश घडू शकतो तसेच संपूर्ण जग बदलू शकते. आणि माध्यमातून पुढे सुंदर भारतासाठी सुंदर विधाता घडू शकतो.
- आपल्या देशाची ओळख ही तिच्या संस्कृतीवरून होत असते. आपल्या संस्कृतीतील प्रत्येक गोष्टीला वैज्ञानिक महत्त्व प्राप्त झाले असून या संस्कृतीचा देशभरात सन्मान केला जातो. त्यामुळे ती टिकविण्यासाठी व देशाच्या विकासासाठी मुलांसह मुलींना देखील शिक्षण दिले पाहिजे.

प्रेरणादायी विचार (Cont'd)

प्रमुख पाहुणे – 2017

श्री. अविनाश धर्माधिकारी, माजी सनदी अधिकारी व संस्थापक – चाणक्य मंडळ परिवार पुणे

जीवन आणि करिअर घडविण्याचे त्रिसूत्र

- 'स्वओळख'–प्रत्येकजण बुद्धिमान आहे, पण प्रत्येकाने आपली बुद्धी कुठे चालते ते ओळखले पहिजे. दुस–याकडे पाहून कोणत्या क्षेत्रात जायचे, हे ठरवू नका.
- 'स्वनिर्णय' – स्वतःचे मन कशात रमते व स्वतःची क्षमता यावर क्षेत्र निवडा. जीवनाची दिशा त्यानुसार ठरवा व जागतिक स्पर्धेत तयार व्हा.
- 'समर्पित' – जागतिक पातळीवरील स्पर्धेचा विचार करून निवडलेल्या क्षेत्रात पूर्णपणे पारंगत, उत्तम व प्रतिभावंत व्हा. त्या क्षेत्रासाठी स्वतःला समर्पित करा, यशस्वी जीवनाची पायाभरणी या टप्प्यातच होते.

प्रमुख पाहुणे – 2016

डॉ. राजन वेळूकर, माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ

- विद्यार्थ्यांनी ही मदत एक संधी म्हणून पाहावी आणि त्याद्वारे विकास साधावा. मुख्य म्हणजे शिक्षण आणि विकास यांचा परस्पर संबधं आहे. कारण जितके जास्त शिक्षण तेवढा देशाचा विकास जास्त होतो.

प्रा. पी.पी. पाटील, कुलगुरू, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ

- श्री. सुरेशदादा जैन यांनी हा उपक्रम जातीपातींपलीकडे राबवून शिक्षणासंबंधी मोठे काम हाती घेतले आहे.
- गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी आर्थिक विवंचनेतील विद्यार्थ्यांना याद्वारे मदत मिळते व त्यांच्या अडचणी दूर होतात.

प्रा. प्रकाश पाठक, कार्यकारी संचालक, भोसला मिलीटरी स्कूल, नाशिक

- उद्याची जीवनाची सूत्रे समजून घेताना विद्यार्थ्यांनी जगातील ज्ञानाच्या मागे झपाटल्यासारखे लागावे.
- शिष्यवृत्ती हा निधी आहे, मात्र तो देण्यामागे ज्यांचा भाव असतो तो ओळखणे महत्त्वाचे आहे.

प्रेरणादायी विचार (Cont'd)

प्रमुख पाहुणे – 2015

डॉ. पंडीत विद्यासागर, कुलगुरू, मराठवाडा विद्यापीठ

- परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता विकसित करा. स्वयंशिस्त लावा त्यामुळे यश मिळेल.
- संधी सांगून येत नाही त्यामुळे मिळालेल्या संधीचा सदुपयोग करा.

डॉ. गिरीश कुलकर्णी, संस्थापक व अध्यक्ष, स्नेहालय, अहमदनगर

- वंचितांना मदत करणे म्हणजे माणुसकीचा धर्म पाळणे होय.
- सुरेशदादांचे हे विद्यार्थ्यांच्या आत्मीयतेपोटी सुरू असलेले कार्य अतिशय निःस्वार्थ आहे. अशा कार्याची आज देशाला आवश्यकता आहे.

प्रमुख पाहुणे – 2014

डॉ. आनंद कर्वे, नामांकित वैज्ञानिक

- आजची जी शिक्षणपद्धती आहे, त्यात विद्यार्थ्यांची जी नवीन विचार करण्याची शक्ती आहे ती मारून टाकली जात आहे. यावर मात करून नव्या विचारांची व्याप्ती अंगीकारणे अत्यंत गरजेचे आहे.
- जगात जी नवकल्पना मांडली, ती भारताने मांडली आहे. त्यामुळे नवीन संशोधक वृत्ती जोपासा, नवनिर्मिती व नवविचारांचा मार्ग पत्करा.

डॉ. सुनिलकुमार लवटे, संशोधक व लेखक

- भारत पुढील काही वर्षात महासत्ता बनू शकतो, यासाठी तरुणांनी पुढे येवून योगदान देणे महत्त्वाचे आहे.
- समाजात विविध माध्यमातून मदत करणाऱ्या दातृत्वामुळे अनेक गरजूंना आधार मिळत असतो.
- महान व्यक्तींच्या सान्निध्यात राहा. मिळालेल्या शिष्यवृत्तीचा उपयोग उत्तम करा.

प्रेरणादायी विचार (Cont'd)

प्रमुख पाहुणे – 2008 ते 2013

डॉ. शंकर पुणतांबेकर, ज्येष्ठ साहित्यिक – **प्रमुख पाहुणे**, 2013

- शिंपल्यात पडणारा पाण्याचा थेंब मोती होतो आणि तोच थेंब सापाच्या तोंडात पडला तर त्याचे विष होते. याप्रमाणे दादांनी सुरू केलेल्या या योजनेतून शिष्यवृत्ती प्राप्त केलेल्या शेकडो विद्यार्थ्यांचे मोती होणार.

डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रसिद्ध वैज्ञानिक – **प्रमुख पाहुणे**, 2011

- विद्यार्थ्यांनी यशाने हुरळून जावू नये.
- प्रयत्नांच्या पराकाष्ठेने यशाचे शिखर गाठल्यास जळगावातील व्यक्तीला नोबेल पारितोषिक मिळू शकते.

डॉ. नरेंद्र जाधव, सदस्य–नियोजन आयोग, भारत सरकार – **प्रमुख पाहुणे**, 2010

- तुमचे ध्येय निश्चित करा आणि ते नक्कीच साध्य कराल असा प्रचंड विश्वास तुमच्यामध्ये असायला हवा.
- परिश्रमाला पर्याय नाही. वेळेचे चांगल्या प्रकारे नियोजन करा.
- पालकांचा आदर करा. सामाजिक जबाबदारी लक्षात ठेवा व नेहमी सकारात्मक विचार करा.

डॉ. एन.के. ठाकरे, माजी कुलगुरू–उमवि – **प्रमुख पाहुणे**, 2009

- रडणाऱ्याला हसवणं, पडलेल्याला उठवणं, गरजवंताला मदत करणं हीच खरी ईश्वरसेवा आहे.
- गरीब, गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती सुरु करून मा. सुरेशदादा खऱ्या अर्थाने ईश्वरसेवा करीत आहेत.

श्री. एम.बी. शाह, ज्येष्ठ साहित्यीक व गांधीवादी विचारवंत – **प्रमुख पाहुणे**, 2008

- त्याग आणि मूल्यांवर आधारित असलेले राहणीमान एक चांगला नागरिक बनविते.

आमचे काही नेत्रदीपक यशस्वी लाभार्थी

महिमा अनिल पाटील
बी.ई.इलेक्ट्रिकल – चतुर्थ वर्ष
गोल्ड मेडल आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात प्रथम क्रमांक

गौरी अरविंद काळे
बी.ई. सिव्हील – चतुर्थ वर्ष
गोल्ड मेडल आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात प्रथम क्रमांक

सुरज संजय पाटील
बी.ई. सिव्हील - चतुर्थ वर्ष
राष्ट्रीय स्तर - स्मार्ट इंडिया हेटकॉन स्पर्धा प्रथम क्रमांक आणि विजेता

निखील यशवंत भगत
बी.ई. E & TC - चतुर्थ वर्ष
राज्य स्तरीय माईलस्टोन पेपर प्रेसेंटेशन स्पर्धा प्रथम क्रमांक

श्रद्धा संजय सोमवंशी
अकरावी सायन्स
दहावी शालांत परीक्षा ९७.८ % गुणांनी उत्तीर्ण

वैभव संजय बिचवे
बी.ई आयटी – तृतीय वर्ष
बी.ई. आयटी द्वितीय वर्षाला ९७.१ % गुणांनी उत्तीर्ण

जया भास्कर साळुंखे
बी.एस्सी. – तृतीय वर्ष
संगीत विशारद अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण

ऋषिकेश ज्ञानेश्वर बारी
एस.वाय.जे.सी (सायन्स)
जळगाव जिल्हा स्तरीय खो-खो संघात निवड

यशस्वी लाभार्थ्यांचे एसडी-सीड बद्दलचे मत----

कादंबरी राजेंद्र गावंडे - एम.बी.ए. फायनान्स (द्वितीय वर्ष)

मी एका खेडेगावातील सामान्य कुटुंबातील असून आई-वडील शेतात मजुरी करतात. एसडी-सीड म्हणजे माझ्या सारख्या विद्यार्थ्यांची जीवनदायीनीच आहे. परिस्थिती शिक्षणाच्या आड येत नाही त्यावर मात करता येते ही सकारात्मक प्रेरणा एसडी-सीड मुळे माझ्यात निर्माण झाली आहे. त्याच्या बळावर मी आज एम.बी.ए.च्या प्रथम वर्षाला शिक्षण घेत आहे. मी आदरणीय सुरेशदादा जैन यांचे खूप मनापासून आभार मानू इच्छिते कारण दादांनी विद्यार्थ्यांप्रती असलेल्या दूरदृष्टीतून एसडी-सीड हे एक उत्तम दर्जाचे संस्थान सुरु केले. त्यातून माझे सारखे देशाचे हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडत आहे. आमच्या सारख्या विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाचा मा. दादांनी जो विडा उचलला आहे तो पूर्णत्वास जावो आणि त्यांनी बघितलेले उज्ज्वल भारताचे स्वप्न आम्ही विद्यार्थी नक्की पूर्ण करणार अशी ग्वाही देते.

राहुल सुधाकर अत्तरदे - जळगाव - बी. ई. कॉम्पुटर (चतुर्थ वर्ष)

मी लहान असतांना वडिलांचे छत्र हरविले. आई हातमजुरी करत असून माझी घरची आर्थिक परिस्थिती बेताची आहे. एसडी-सीड शिष्यवृत्तीच्या मदतीने मी आज बी.ई. कॉम्पुटरच्या तृतीय वर्षाला शिक्षण घेत आहे. मी दहावी उत्तीर्ण झाल्यावर शिक्षण सोडून आईला हातभार म्हणून मजुरीचे काम करेल असे ठरविले होते. अशा मनस्थितीत असतांना गुणवत्तेच्या आधारावर एसडी-सीड शिष्यवृत्तीसाठी मी पात्र ठरलो. माझा सर्व खर्च मी यातून पूर्ण करत आहे. तृतीय वर्षाला शिक्षण घेत असतांना एसडी-सीड कडून नामांकित कंपनीत मला इंटर्नशिपची संधी मिळाली. माझ्या सारख्या अनेक होतकरू विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीमुळे फार मोलाची मदत मिळत आहे. एसडी-सीडच्या मातृत्वरूपी मदतीला माझा सलाम आणि मी सदैव एसडी-सीडच्या ऋणात राहू इच्छितो.

मीनाक्षी प्रविण शिवपूजे – भुसावळ - बी. टेक. फूड टेक्नोलॉजी (चतुर्थ वर्ष)

मी बी.टेक. फूड टेक्नोलॉजीच्या चौथ्या वर्षाला शिकत आहे. मी सातवीत असतांना वडिलांचे छत्र हरविले. आईने मजुरी, धुणीभांडी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविला. या शिष्यवृत्तीमुळे माझ्या पंखांना बळ मिळाले आहे. आमचे आ. सुरेशदादा जैन यांच्या एसडी-सीडमुळे मी माझे ध्येय नक्कीच पूर्ण करू शकते याची खात्री आहे. आपण एकटे नाहीत तर दादांसारखं दातृत्व असलेले उदार मनाचे दानशूर आजही समाजातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या मुलांना मदत करीत आहेत यामुळे एक मानसिक आधार मिळतो. हा उपक्रम असाच सुरु रहावा हीच इच्छा व्यक्त करते आणि मा. दादांना दीर्घायुष्य लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना करते. मी सुद्धा हा उपक्रम पुढे चालू रहावा म्हणून आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्यावर माझ्याने जेवढी शक्य होईल तेवढी मदत करेल.

मनोहर रवींद्र पाटील - धरणगाव - बीएएमएस (प्रथम वर्ष)

मी लहान असतांनाच माझ्या वडिलांचे निधन झाले. घरची आर्थिक परिस्थिती साधारण असून आई रोजंदारीने शेतात काम करते व त्यावरच आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. जेव्हा आपल्यावर संकटे येतात अशा समयी ती निवारण्यासाठी परमेश्वर कोणाच्या तरी माध्यमातून त्यांना दूर करण्यासाठी मार्ग दाखवितो. मला सांगतांना अतिशय आनंद होत आहे की, एसडी-सीड शिष्यवृत्तीच्या माध्यमातून आदरणीय सुरेशदादा जैन यांच्या रूपाने परमेश्वराने मला तो मार्ग दाखविला आहे. त्यातूनच मला शिक्षणासाठी आर्थिक मदत मिळत आहे. आदरणीय सुरेशदादा यांच्या विद्यार्थ्यांप्रती असलेल्या दूरदृष्टीतून मी नक्कीच एक चांगला डॉक्टर होईल असा आत्मविश्वास निर्माण झाला आहे. मा. दादांच्या रूपाने मला वडिलांचे छत्र लाभले असून ईश्वर त्यांना दीर्घायुष्य देवो ही प्रार्थना करतो.

निष्कर्ष

- चांगले शिक्षण व्यक्तीचे चारि़त्र्य घडविते.
- चांगले शिक्षण जीवन सुसंस्कारित व सुसंस्कृत करते.
- चांगल्या शिक्षणामुळे महत्त्वाकांक्षी संधी निर्माण होतात.
- चांगल्या शिक्षणामुळे एक चिरंतन समाज निर्माण होतो.
- चांगले शिक्षण मानवता टिकून राहण्यासाठी आवश्यक आहे.
- एसडी–सीड वंचित मुलांना चांगले शिक्षण देणे.
- एसडी–सीड सर्वांचे भविष्य उज्ज्वल व्हावे यासाठी बांधणी करीत आहे.

धन्यवाद